# भारतीय पर्यावरण चळवळीतील महिलांचे योगदान – एक अभ्यास

**सौ. वर्षा सूर्यकांत मस्के** सहाय्यक शिक्षिका, ताराराणी विद्यापीठाचे उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर.

इमेल : varshamaske7279@gmail-.com

---

**प्रस्तावना :-**

पर्यावरण म्हणजे जैविक आणि अजैविक घटकातील त्या त्या परिसरात होणारी आंतरक्रिया. पर्यावरण हे सजीवांना आधार देते सोबत त्यांचे पालनपोषण देखील करते. एकंदरीत पर्यावरण सजीवाच्या जीवनावर प्रभाव टाकते. पर्यावरण आणि मानव यांच्यात देखील घनिष्ट संबंध आहे. मानव किंबहुना पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीव हा पर्यावरणाचा घटक असला तरी मानवाकडून होणाऱ्या विविध क्रिया प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पर्यावरणावर परिणाम करताना दिसतात. मानवाने स्वतःच्या प्रगतीसाठी पर्यावरणावर घाला घातला आहे. त्याचे अनिष्ट परिणाम सद्या पर्यावरणावर झालेले दिसून येत आहेत. मानवाने लालसे पोटी आणि स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद वापर सुरू केला आहे. यासाठी वृक्षांची बेसुमार तोड केली जात आहे यामुळे पृथ्वीवरील संतुलन बिघडत आहे. सततच्या होणाऱ्या मानवी हस्तक्षेपांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. परिसंस्थांवर याचा गंभीर परिणाम होताना दिसत आहे.

परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक या वनस्पती आहेत ज्यांच्यावर इतर सजीव प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अवलंबून आहेत. या वनस्पतीची, वृक्षांची पूजा करणे हे आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. महिला आणि वनस्पती म्हणजेच पर्यावरण यांचे अतूट नाते आहे. भारतीय संस्कृतीत स्त्रीला "प्रकृती" मानले जाते. स्त्री ही सृष्टीची निर्माती आणि पालनकर्ती आहे जी वृक्ष संवर्धनासाठी योगदान देते. इतकेच नव्हे तर वृक्ष संवर्धनासाठी महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. ऐतिहासिकदृष्ट्या महिलांनी पर्यावरण संवर्धनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

भारतीय महिलांनी त्यांच्या परीने जंगलसंवर्धन, जलसंधारण आणि जैवविविधता रक्षणासाठी मोठे योगदान दिले आहे. स्त्रिया केवळ समाजाच्या पुनरुत्पादनाची जननी नसून, पर्यावरणसंवर्धनाच्या प्रक्रियेतही त्यांच्या भूमिका निर्णायक ठरल्या आहेत. पारंपरिक ज्ञान, संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष कृतीच्या आधारे स्त्रियांनी अनेक पर्यावरणीय चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. भारतातील अनेक पर्यावरण चळवळींमध्ये महिला नेत्यांनी नेतृत्व करत, समाजाला जागृत केले आणि शासनाच्या धोरणांवर प्रभाव टाकला.

आपल्या जीवनावश्यक गरजा या निसर्गाकडूनच पूर्ण होतात त्यामुळे निसर्गावर आघात म्हणजे पर्यावरणावर आघात हे त्या जाणतात, त्यामुळेच पर्यावरणीय समस्या दूर करण्यासाठी महिला या नेहमीचं आघाडीवर असल्याचे दिसून येते. पर्यावरणाच्या ऱ्हासाला थांबवण्यासाठी केली जाणारी सामाजिक चळवळ म्हणजेच पर्यावरण चळवळ होय. नैसर्गिक साधन संपत्तीला हानी पोहोचवणाऱ्या मानवी कृतींना थांबवणे आणि पर्यावरण संवर्धन करणे पर्यावरण चळवळींचा महत्त्वाचा उद्देश आहे. भारतातील अनेक पर्यावरण चळवळींमध्ये महिलांचा महत्त्वपूर्ण असा सहभाग दिसून येतो. बिश्नोई चळवळ, चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, सायलेंट व्हॅली चळवळ यांसारख्या चळवळींमधून महिलांनी नेतृत्व करून पर्यावरण संरक्षणासाठी संघर्ष केला आहे. या शोध निबंधात भारतीय पर्यावरण चळवळीतील महिलांच्या योगदानाचे तपशीलवार विश्लेषण केले आहे.

**उद्दिष्टे -**

१. भारतीय पर्यावरण चळवळीतील महिलांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

२. महिलांच्या सहभागामुळे या चळवळींना झालेल्या लाभाचे विश्लेषण करणे.

३. पर्यावरण संवर्धनामध्ये महिलांना आलेल्या अडचणी आणि त्यांच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

४. भविष्यातील पर्यावरण धोरणांमध्ये महिलांचा अधिक प्रभावी सहभाग कसा वाढवता येईल, याचा आढावा घेणे.

**कार्यपद्धती -**

सदर अभ्यासासाठी प्रामुख्याने प्रस्थापित संशोधन पत्रके, पर्यावरण चळवळींच्या अहवालांचा अभ्यास, विविध संस्थांचे अहवाल आणि महिला पर्यावरण कार्यकर्त्यांच्या अनुभवांवर आधारित माहिती संकलित केली आहे.

**भारतातील पर्यावरण चळवळी आणि महिलांचे योगदान -**

**१. बिश्नोई चळवळ (1730) :**

पर्यावरणीय संतुलन आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण हे मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक घटक आहेत. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता, भारतात अशा अनेक चळवळी उदयास आल्या ज्या पर्यावरण रक्षणासाठी समर्पित होत्या.

त्यातील एक महत्त्वपूर्ण चळवळ म्हणजे बिश्नोई चळवळ (1730), जी पर्यावरणीय संरक्षणासाठी आत्मबलिदानाच्या उच्चतम उदाहरणांपैकी एक मानली जाते.

१७३० मध्ये जोधपूरच्या तत्कालीन राजा अभयसिंह यांनी नवीन राजवाडा बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणात इंधनाची गरज भासल्याने खेजरली परिसरातील झाडे तोडण्याचा आदेश दिला. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी सैनिक आणि मजूर पाठवण्यात आले. मात्र, बिश्नोई समाज, जो निसर्ग आणि वन्यजीव संरक्षणासाठी प्रसिद्ध आहे, त्यांनी याला तीव्र विरोध केला.

बिश्नोई समाजाच्या अमृता देवी बिश्नोई या धाडसी महिलेने सैनिकांना प्रतिकार करण्यासाठी झाडांना मिठी मारण्याचे पद्धतशीर आंदोलन सुरू केले. तिच्या प्रेरणेतून तिच्या मुलींसह इतर ३६३ बिश्नोई नागरिकांनी झाडांना आलिंगन देऊन त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. परंतु सैनिकांनी निर्दयपणे त्या सर्वांची हत्या केली.

बिश्नोई चळवळ ही भारतामधील सर्वप्रथम पर्यावरण संरक्षण चळवळ मानली जाते. या घटनेतून पुढे "चिपको आंदोलन" आणि जगभरात वृक्षसंवर्धनासाठी "ट्री हगिंग मूव्हमेंट" यासारख्या संकल्पनांना प्रेरणा मिळाली. या चळवळीने पर्यावरणीय साक्षरतेचा आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

भारत सरकारने बिश्नोई समाजाच्या त्यागाला मान्यता देत "अमृता देवी वन्यजीव संरक्षण पुरस्कार" सुरू केला. हा पुरस्कार पर्यावरण रक्षण आणि वन्यजीव संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. २००१ साली पहिला पुरस्कार जोधपूरच्या गंगाराम बिश्नोई यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

बिश्नोई चळवळ ही भारताच्या पर्यावरणीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना असून, निसर्गसंवर्धनाच्या दिशेने घेतलेले क्रांतिकारी पाऊल होते. बिश्नोई समाजाने दिलेला संदेश स्पष्ट आहे – "पर्यावरणाशिवाय मानवी अस्तित्व अशक्य आहे, त्यामुळे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे."

**२. चिपको आंदोलन (1973-74) :**

चिपको आंदोलन (1973-74) हे भारतातील एक महत्त्वपूर्ण पर्यावरणीय आणि सामाजिक आंदोलन होते, ज्यामध्ये स्थानिक ग्रामस्थ, विशेषतः महिला, यांनी वृक्षतोडीला विरोध करून जंगल संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेतला. हे आंदोलन जैवविविधता संरक्षण, वन पर्यावरणाच्या टिकाव, आणि स्थानिक समुदायांच्या वनाधिकारांच्या संदर्भात एक ऐतिहासिक टप्पा ठरले.

1973 मध्ये उत्तर प्रदेश (सध्याचे उत्तराखंड) राज्यातील अलकनंदा खोऱ्यातील 'मंडल' गावात चिपको आंदोलनाला सुरुवात झाली. सरकारने या भागातील घनदाट जंगलाचा मोठा हिस्सा व्यावसायिक उद्देशांसाठी एका क्रीडा साहित्य निर्मिती करणाऱ्या कंपनीला दिला होता. स्थानिक 'दाशौली ग्राम स्वराज्य संघा'ने शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांसाठी या जंगलातील वृक्षतोडीसाठी मागणी केली होती, परंतु ती सरकारने फेटाळली होती. परिणामी, स्थानिक समुदायामध्ये असंतोष निर्माण झाला आणि त्यांनी शासनाच्या धोरणाला प्रत्यक्ष विरोध करण्याचा निर्णय घेतला.

चिपको आंदोलन हे अहिंसात्मक मार्गाने पर्यावरण संवर्धनासाठी करण्यात आलेले सत्याग्रही आंदोलन होते. 'चिपको' या शब्दाचा अर्थ 'चिटकून राहणे' किंवा 'मिठी मारणे' असा होतो. ठेकेदार आणि मजूर वृक्षतोडीसाठी आल्यावर, स्थानिक ग्रामस्थ—विशेषतः महिला—झाडांना कवटाळून उभे राहत असत, ज्यामुळे वृक्षतोड करणे अशक्य होई. 'पेड काटने नही देंगे' अशा घोषणा देत त्यांनी पर्यावरणसंवर्धनाचा जागर केला.

चिपको आंदोलनाच्या यशामध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. गौरादेवी, सुदेशा देवी, बचनी देवी आणि इतर महिलांनी पुढाकार घेतला आणि संपूर्ण समाजाला संघटित केले. गौरादेवी यांनी आपल्या गावातील महिलांना एकत्र करून जंगलतोड रोखण्याचा निर्धार केला. ठेकेदारांनी पुरुषांना आर्थिक प्रलोभन देऊन चमोली येथे बोलावून घेतले, परंतु गावातील महिलांनी स्वतः झाडांना मिठी मारून मजुरांना रोखले. महिलांनी केवळ आंदोलनच केले नाही तर पर्यावरण संवर्धनासाठी वैचारिक पातळीवरही जनजागृती केली. या आंदोलनाचा परिणाम म्हणून सरकारला जंगलतोडीची चौकशी समिती स्थापन करावी लागली. अखेरीस, 26 मार्च 1974 रोजी उत्तर प्रदेश राज्य सरकारने अलकनंदा खोऱ्यातील व्यावसायिक वृक्षतोडीवर 10 वर्षांसाठी बंदी घातली. हा निर्णय जैवविविधता आणि पर्यावरणीय स्थिरतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला.

**चिपको आंदोलनाने खालील पर्यावरणीय उद्दिष्टे साध्य केली-**

**जैवविविधतेचे संरक्षण:** स्थानिक प्रजातींच्या झाडांचे संरक्षण झाले आणि त्यासंबंधित परिसंस्था टिकून राहिली.

**वन-पर्यावरणाची शाश्वतता**: जंगलतोड थांबविल्याने मृदा धूप, पूरस्थिती आणि भूगर्भीय अस्थिरता रोखण्यास मदत झाली.

**स्थानीय समुदायांचे हक्क**: स्थानिक ग्रामस्थांना त्यांच्या जंगलांवरील अधिकारांची जाणीव झाली आणि त्यांनी आपल्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्याचा अधिकार मागितला.

चिपको आंदोलनामुळे भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पर्यावरणीय चळवळींना प्रेरणा मिळाली. 1978 मध्ये टिहरी गढवाल जिल्ह्यातील 'अडवाणी' जंगलात स्थानिक कार्यकर्ते धूमसिंग नेगी यांनी आंदोलन सुरू केले, जिथे महिलांनी वृक्षांना धागे बांधून 'रक्षा सूत्र' म्हणून त्यांचे संरक्षण केले. सुंदरलाल बहुगुणा यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करून वनधोरणाच्या विरोधात दोन आठवडे उपोषण केले आणि सरकारला पर्यावरणपूरक धोरणे अवलंबण्यास भाग पाडले. 'इको-फेमिनिझम'च्या संकल्पनेला चालना मिळाली, ज्यामध्ये स्त्रिया आणि पर्यावरण संवर्धन यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित करण्यात आला.

चिपको आंदोलन हे भारताच्या पर्यावरणीय चळवळींमधील मैलाचा दगड ठरले. या आंदोलनाने निसर्गसंपत्तीच्या वापराविषयी एक नवीन विचारसरणी समाजात रुजवली. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांचे नेतृत्व आणि सहभाग यामुळे हे आंदोलन केवळ पर्यावरण संवर्धनापुरते मर्यादित न राहता सामाजिक न्याय आणि स्थानिक अधिकारांच्या संदर्भातही महत्त्वाचे ठरले. त्यामुळेच चिपको आंदोलन हे भारताच्या पर्यावरणीय आणि सामाजिक इतिहासात एक आदर्श उदाहरण म्हणून कायम स्मरणात राहील.

**३. नर्मदा बचाव आंदोलन (1985) :**

नर्मदा बचाव आंदोलन (Narmada Bachao Andolan- NBA) हे विस्थापन, पर्यावरणीय समतोल आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी चालवले गेलेले एक महत्त्वपूर्ण सामाजिक आंदोलन आहे. भारतातील सर्वात मोठ्या नदी प्रकल्पांपैकी एक सरदार सरोवर धरणामुळे हजारो आदिवासी, शेतकरी आणि स्थानिक रहिवासी विस्थापित होणार होते. या पार्श्वभूमीवर, पुनर्वसनाच्या अपुऱ्या आणि अपयशी धोरणांना विरोध करण्यासाठी हे आंदोलन 1985 साली सुरू झाले.

नर्मदा नदीवरील जलविद्युत आणि सिंचन प्रकल्पांची संकल्पना 1946 मध्ये चर्चेत आली. तथापि, नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाने (Narmada Water Disputes Tribunal - NWDT) 1978 पर्यंत कोणतेही स्पष्ट आदेश दिले नव्हते. सरदार सरोवर धरण प्रकल्प हा भारत सरकारच्या नियोजनाचा एक भाग होता, ज्यामुळे 244 गावे आणि सुमारे 2,50,000 नागरिक विस्थापित होणार होते.

सरदार सरोवर धरणामुळे स्थानिक आदिवासी आणि शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर प्रभावित होणार होता. हे प्रामुख्याने भिल्ल, गोंड, बैगा यांसारख्या आदिवासी जमातींवर परिणाम करत होते, ज्यांची उपजीविका शेती आणि जंगलांवर अवलंबून होती. विस्थापनाच्या भीतीने या लोकांनी संघर्ष करण्यास सुरुवात केली. याचे प्रमुख उद्दीष्ट खालीलप्रमाणे होते:

पुनर्वसन धोरण स्पष्ट करणे आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन करून धोरणात्मक सुधारणा सुचवणे. मानवी हक्कांचे उल्लंघन रोखणे आणि प्रभावित लोकांसाठी न्याय मिळवणे.

1985 मध्ये "नर्मदा धरणग्रस्त समिती" स्थापन करण्यात आली, जी 1989 मध्ये "नर्मदा बचाव आंदोलन" म्हणून ओळखली जाऊ लागली. सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन अधिक तीव्र झाले. आंदोलकांनी अहिंसात्मक मार्गांचा अवलंब केला, ज्यामध्ये शांततापूर्ण निदर्शने, उपोषणे, सत्याग्रह आणि न्यायालयीन प्रक्रिया यांचा समावेश होता.

1990 मध्ये, पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या निवासस्थानी पाच दिवसांचे लाक्षणिक उपोषण आयोजित करण्यात आले, ज्यामुळे या प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याचे आश्वासन देण्यात आले. तथापि, आंदोलन चिरडण्यासाठी सरकारने पोलिसांकडून आंदोलकांवर कारवाई केली. 1991 मध्ये मेधा पाटकर यांना अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला.

1990 च्या दशकात नर्मदा बचाव आंदोलनाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. 2005 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पुनर्वसन पूर्ण होईपर्यंत धरणाचे पुढील बांधकाम थांबवण्याचा आदेश दिला. तथापि, हा आदेश डावलण्यात आला आणि राज्य शासनाने काम सुरूच ठेवले.

2006 मध्ये आंदोलनकर्त्यांनी सरदार सरोवर प्रकल्पातील भ्रष्टाचार उघड केला, ज्यामुळे अनेक अधिकारी आणि कर्मचारी निलंबित करण्यात आले. 2010 मध्ये केंद्रीय जल आयोगाने पुढील बांधकामास परवानगी नाकारली, ज्यामुळे आंदोलनाला यश मिळाले.

नर्मदा बचाव आंदोलनात महिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विस्थापितांच्या हक्कांसाठी त्यांनी लढा दिला आणि पर्यावरणीय मुद्द्यांबाबत जागरूकता निर्माण केली. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरांवर या आंदोलनाचा दीर्घकालीन प्रभाव पडला.

नर्मदा बचाव आंदोलन हे विस्थापन, पर्यावरणीय समतोल आणि सामाजिक न्यायासाठी चालवले गेलेले भारतातील एक महत्त्वाचे आंदोलन आहे. हे आंदोलन विस्थापितांच्या न्यायसाठी लढले आणि विकासाच्या प्रक्रियेत लोकसहभाग आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. सरकारी प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचे सखोल मूल्यांकन करणे गरजेचे आहे, अन्यथा अशा आंदोलनांची आवश्यकता सतत निर्माण होत राहील.

**४. सायलेंट व्हॅली चळवळ (1975-1984) :**

सायलेंट व्हॅली चळवळ ही भारतातील पर्यावरण रक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वाची आणि प्रभावी चळवळ होती. केरळ राज्यातील जैवविविधतेने समृद्ध अशा सायलेंट व्हॅली परिसरात प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाच्या विरोधात ह्या चळवळीचा उदय झाला. या चळवळीत विज्ञाननिष्ठ संशोधन, सामाजिक जनजागृती आणि साहित्यिक सृजनशीलतेच्या माध्यमातून प्रभावी निषेध नोंदवण्यात आला. विशेषतः, महिलांनी या चळवळीत निर्णायक भूमिका बजावली आणि पर्यावरण संरक्षणाच्या लढ्यात एक महत्त्वाचा टप्पा गाठला.

सायलेंट व्हॅली चळवळीच्या नेतृत्वात कवयित्री आणि पर्यावरण कार्यकर्त्या सुगाथाकुमारी यांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा होता. त्यांनी 'सायलेंट व्हॅली वाचवा' या मोहिमेचे नेतृत्व करत स्त्री शक्ती आणि पर्यावरण संरक्षणाचा अद्वितीय संगम घडवून आणला. त्यांची 'ओड टू अ ट्री' (Ode to a Tree) ही कविता चळवळीचे प्रतीक बनली आणि चळवळीच्या प्रत्येक बैठकीची सुरुवात या कवितेच्या गायनाने केली जात असे. त्यांनी सायलेंट व्हॅलीसाठी व्यापक जनजागृती अभियान राबवले, ज्यामध्ये महिला, विद्यार्थी, साहित्यिक आणि पर्यावरण प्रेमी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले.

त्यांनी केरळ सरकार तसेच केंद्र सरकारकडे जलविद्युत प्रकल्प त्वरित थांबवावा ही सातत्याने मागणी केली. सायलेंट व्हॅली परिसरात राहणाऱ्या आदिवासी आणि ग्रामीण महिलांनीही या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. या प्रकल्पामुळे त्यांचे नैसर्गिक संसाधनांवरचे हक्क धोक्यात येणार होते. त्यामुळे त्यांनी रॅली, निषेध सभा, आंदोलन आणि पत्रव्यवहाराच्या माध्यमातून आपला विरोध दर्शवला. अनेक महिला आपल्या कुटुंबासह आंदोलनामध्ये सहभागी झाल्या आणि जंगल वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष कृती केली. वनसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षण या दृष्टीने स्त्रियांच्या सहभागामुळे चळवळीला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

सायलेंट व्हॅली ही पश्चिम घाटातील एक महत्त्वाची जैवविविधता हॉटस्पॉट असून, येथे अनेक दुर्मिळ वनस्पती आणि प्राण्यांचे अधिवास आढळतात. वैज्ञानिकदृष्ट्या पाहता, येथे जलविद्युत प्रकल्प उभारल्यास संपूर्ण परिसंस्था असंतुलित होण्याचा धोका होता. महिला शास्त्रज्ञ, शिक्षिका आणि पर्यावरण अभ्यासकांनी या चळवळीला पाठिंबा दिला आणि जलविद्युत प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. त्यांनी परिसंस्थेच्या वनस्पतीशास्त्रीय आणि प्राणिशास्त्रीय घटकांवर होणाऱ्या परिणामांचे संशोधन सादर करून प्रशासनावर दबाव टाकला.

सुगाथाकुमारी आणि इतर महिलांच्या नेतृत्वाखालील या चळवळीमुळे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. 1984 मध्ये भारत सरकारने सायलेंट व्हॅली जलविद्युत प्रकल्प पूर्णतः रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्याच वर्षी सायलेंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले, ज्यामुळे येथील परिसंस्था कायमस्वरूपी संरक्षित झाली. या चळवळीने महिलांच्या पर्यावरणीय चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याचे उदाहरण उभे केले, जे पुढील अनेक पर्यावरणीय चळवळींसाठी प्रेरणादायी ठरले.

सायलेंट व्हॅली चळवळ ही पर्यावरण संरक्षण आणि महिला नेतृत्वाचा उत्तम संगम होता. कवयित्री सुगाथाकुमारी यांच्या नेतृत्वाखाली साहित्य, विज्ञान आणि सामाजिक चळवळ यांचा समन्वय साधून मोठे यश मिळवण्यात आले. आदिवासी, ग्रामीण आणि शहरी महिलांनी सहभाग घेऊन पर्यावरण रक्षणासाठी निर्णायक भूमिका बजावली. ही चळवळ भारतातील सतत वाढणाऱ्या औद्योगिकीकरणाच्या विरोधात पर्यावरण संवर्धनाच्या चळवळींना दिशा देणारी ठरली. महिलांनी यात घेतलेला पुढाकार हा महिला सशक्तीकरण आणि पर्यावरण संरक्षण यासाठी आदर्श ठरला.

**५. अप्पिको आंदोलन (1983) :**

अप्पिको आंदोलन हे पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. उत्तर कन्नड आणि शिमोगा जिल्ह्यात 1983 मध्ये सुरू झालेल्या या चळवळीमध्ये स्थानिक महिलांचा मोठा आणि सक्रिय सहभाग होता. जंगलतोडीला

विरोध करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष झाडांना कवटाळले, पर्यावरण संवर्धनाचा प्रचार केला आणि समाज जागृतीत महत्त्वाची भूमिका बजावली. अप्पिको आंदोलनात महिलांनी झाडे वाचवण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली. पुरुषांसोबत महिलाही मोठ्या संख्येने जंगलात गेल्या आणि झाडांना मिठी मारून शासनाच्या वृक्षतोड धोरणाला आव्हान दिले.

काही ठिकाणी महिलांनी जीवाची पर्वा न करता झाडे तोडू पाहणाऱ्या कामगारांना रोखले. महिलांनी जंगल संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली आणि जंगलाच्या उपयोगाविषयी स्थानिक समाजात जागृती केली. त्यांनी गावातील इतर महिलांना आणि मुलांना जंगलतोड रोखण्यासाठी एकत्र केले. झाडे ही केवळ लाकूडपुरवठ्यासाठी नसून पाणी, हवा आणि मातीच्या समतोलासाठी आवश्यक आहेत, हे त्यांनी लोकांना समजावून सांगितले.

महिलांनी पर्यावरणीय शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून अप्पिको चळवळ व्यापक केली. महिलांनी लोककथा, नाटके आणि गाणी यांच्या माध्यमातून गावागावात पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवला. महिलांनी आपल्या कुटुंबीयांसोबतच शेजारी-पाजारी आणि इतर गावांतील लोकांनाही जंगलसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. काही ठिकाणी महिलांनी स्वयंसहायता गट तयार करून जंगल संवर्धनासंबंधी उपक्रम राबवले.

स्थानिक महिलांनी मिळून गावपातळीवर "वनसंवर्धन गट" स्थापन करून वृक्षतोडीला विरोध दर्शवला. पांडुरंग हेगडे यांच्या नेतृत्वाखालील चळवळीत महिलांनी स्वयंप्रेरणेने मोठा वाटा उचलला. महिलांनी औषधी वनस्पती आणि स्थानिक जातींच्या झाडांचे संवर्धन करण्यावर भर दिला.

जंगलतोड थांबवल्यानंतर, वृक्षारोपण मोहिमांमध्ये मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. काही गावांमध्ये महिलांनी जंगलातील नद्या, ओढे आणि जलस्त्रोतांची स्वच्छता व संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. महिलांच्या सक्रिय सहभागामुळे अप्पिको आंदोलन केवळ झाडे वाचवण्यापुरते मर्यादित न राहता, ते एक पर्यावरण संरक्षण आणि टिकाव विकासाचे उदाहरण ठरले. 1989 मध्ये हिरव्या वृक्षांच्या तोडीवर बंदी घालण्यात आली आणि त्यानंतर महिलांनी वृक्षारोपणाला चालना दिली. गावपातळीवर अनेक ठिकाणी महिलांनी पुढाकार घेऊन पर्यावरणपूरक शेती आणि उपजीविकेचे मार्ग शोधले.

अप्पिको आंदोलनात महिलांचा सहभाग हा केवळ पाठिंबा देणारा नव्हता, तर ते आंदोलनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ होते. त्यांनी जंगलसंवर्धनासाठी प्रत्यक्ष योगदान दिले, समाजात जागृती निर्माण केली आणि पर्यावरण संरक्षणाच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अप्पिको आंदोलनाने महिलांच्या सामर्थ्याचे दर्शन घडवले आणि त्यांची भूमिका पर्यावरणीय चळवळींमध्ये निर्णायक ठरली.

**६. गंधमर्दन चळवळ :**

गंधमर्दन चळवळ ओडिशा राज्यातील पर्यावरणीय आणि जैवविविधता संरक्षणासाठी चालवण्यात आलेली एक महत्त्वपूर्ण चळवळ होती. या चळवळीमध्ये स्थानिक आदिवासी समुदाय, विशेषतः महिलांनी, मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. त्यांनी आपल्या पारंपरिक ज्ञानाचा वापर करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना राबवल्या. गंधमर्दन टेकड्या पश्चिम ओडिशातील बलांगीर आणि बारगढ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या आहेत. या भागातील घनदाट जंगल, समृद्ध जैवविविधता, आणि औषधी वनस्पतींमुळे या टेकड्यांना विशेष वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या परिसरात अनेक दुर्मिळ आणि स्थानिक जैवप्रजाती आढळतात, ज्यामुळे हा प्रदेश पर्यावरणीय दृष्टिकोनातून संवेदनशील मानला जातो.

१९८०च्या दशकात राष्ट्रीय स्तरावरील खाणकाम कंपन्यांनी गंधमर्दन टेकड्यांमध्ये बॉक्साइट खाणकाम करण्याचा प्रस्ताव ठेवला. बॉक्साइटच्या उत्खननामुळे जमिनीचे धूप, जैवविविधतेचे नुकसान, जलप्रदूषण, आणि आदिवासी जीवनशैली धोक्यात येण्याची शक्यता होती. हे खाणकाम जंगल नष्ट करून पर्यावरणीय असंतुलन निर्माण करू शकले असते. गंधमर्दन टेकड्यांच्या संरक्षणासाठी स्थानिक आदिवासी समुदायांनी मोठ्या प्रमाणावर विरोध केला. विशेषतः महिलांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी खालील प्रकारे सहभाग घेतला:

महिलांनी जंगलतोडी विरोधात प्रत्यक्ष आंदोलने केली आणि उत्खननाच्या जागी निषेध नोंदवला. पारंपरिक वनसंवर्धन तंत्रांचा वापर करून त्यांनी जंगलाचे संरक्षण केले. स्थानिक समारंभ, परंपरागत गीतं आणि नृत्यांच्या माध्यमातून त्यांनी जनजागृती केली. महिलांनी प्रशासनाच्या विरोधात शांततापूर्ण मोर्चे काढून त्यांच्या हक्कांची मागणी केली. या चळवळीमुळे गंधमर्दन टेकड्यांचे खाणकाम थांबवले गेले, ज्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण शक्य झाले. महिलांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनाने पर्यावरणशास्त्र आणि सामाजिक समता यांच्यातील परस्परसंबंध अधोरेखित केला.

गंधमर्दन चळवळ ही पर्यावरणीय न्यायाच्या लढ्यातील एक यशस्वी चळवळ आहे, ज्यात आदिवासी महिलांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यांनी निसर्गसंपत्तीचे रक्षण करून टिकाऊ विकासाच्या संकल्पनेला चालना दिली. या चळवळीने सिद्ध केले की महिलांचे स्थानिक आणि पारंपरिक ज्ञान पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**पर्यावरणीय चळवळींतील महिलांच्या योगदानाचे परिणाम -**

**१. वृक्षतोडीला आळा** – महिलांच्या नेतृत्वाखालील चळवळींमुळे अनेक जंगलांमध्ये अनिर्बंध वृक्षतोड रोखण्यात यश मिळाले.

**२. सजीवसृष्टीचे संवर्धन** – जैवविविधतेचे रक्षण करण्यात महिलांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

**३. पर्यावरणीय कायद्यांमध्ये सुधारणा** – चळवळींमुळे सरकारने पर्यावरण संरक्षणासाठी कठोर कायदे लागू केले गेले.

**४. स्थलांतरित समुदायांचे पुनर्वसन** – विस्थापितांसाठी पुनर्वसन आणि हक्कांसाठी महिलांनी प्रभावी लढे दिले.

**पर्यावरणीय चळवळींतील अडचणी आणि आव्हाने -**

**१. संस्कृती आणि रूढीवादी मानसिकता** – अनेक ठिकाणी महिलांच्या सहभागावर बंधने असतात.

**२. शैक्षणिक संधींचा अभाव** – अनेक ग्रामीण भागात महिलांना पर्यावरणीय शिक्षणाची संधी मिळत नाही.

**३. आर्थिक मदतीचा अभाव** – महिलांच्या पर्यावरणीय चळवळींना आर्थिक पाठबळ कमी मिळते.

**४. धोरणनिर्मितीत मर्यादित सहभाग** – महिलांना धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत पुरेसा वाव मिळत नाही.

**निष्कर्ष –**

महिलांनी पर्यावरण संवर्धनाच्या प्रत्येक टप्प्यावर योगदान दिले आहे. भारतातील विविध चळवळींमध्ये महिलांचा प्रभावी सहभाग दिसून येतो. परंतु, अजूनही महिलांना धोरणनिर्मितीत अधिक संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करताना महिलांचा सहभाग सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**समारोप -**

पर्यावरणीय चळवळ ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील चळवळ आहे, ज्याचे प्रतिनिधित्व अनेक पर्यावरणवादी संस्थांद्वारे केले जाते. महिला आणि पर्यावरण हे परस्परावलंबी घटक आहेत. भारतातील पर्यावरण चळवळींमध्ये महिलांनी ऐतिहासिक योगदान दिले आहे. त्यांचा सशक्त सहभाग भविष्यातील पर्यावरणीय आव्हाने सोडवण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे शासन आणि समाजाने महिलांना या क्षेत्रात अधिक सक्रिय भूमिका बजावण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

विशेष म्हणजे यामध्ये महिलाचा समावेश हा महत्वपूर्ण आहे. पर्यावरणशास्त्र, सामाजिक आरोग्य आणि मानवी हक्क हे पर्यावरण चळवळींचे केंद्रबिंदू आहेत. ज्यामध्ये नैसर्गिक संसाधनांच्या दीर्घकालीन व्यवस्थापनाचा पुरस्कार केला जातो. महिलांनी पर्यावरण संरक्षणासाठी ऐतिहासिक आणि सामाजिक स्तरावर मोठे योगदान दिले आहे.

पर्यावरण संवर्धन हे केवळ सरकारी धोरणांवर अवलंबून नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. महिलांसाठीचे जागरूकता कार्यक्रम, शिक्षण, आणि सक्रीय सहभाग यामुळे पर्यावरण संरक्षणाला बळकटी मिळेल. त्यामुळे भावी पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण निर्माण करण्यासाठी महिलांचा सहभाग वाढवण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

1. नाईक, पी. (2018). पर्यावरणीय संरक्षणासाठी महिलांचे पारंपरिक ज्ञान, विविधता आणि संरक्षण, 7(1), 12-20.

2. Choudhury, D. (2016). Women's leadership in environmental management: The case of India. Journal of Environmental Studies, 22(3), 345-356.

3. Dube, N., & Dutta, D. (2017). Gender and environmental sustainability: A study of women's contribution.EnvironmentalSociology,3(2),141153.https://doi.org/10.1080/23251042.2017.129223

4. Khosla, R. (2018). Women and climate change: The role of women in environmental conservation. Environmental Research Letters, 13(10), 1-10. https://doi.org/10.1088/1748-9326/aad206

5.साळुंखे, जे. (2019). आदिवासी महिलांचे पर्यावरणीय ज्ञानः एक अभ्यास. समाजशास्त्र आणि पर्यावरण, 6(3), 88-97.

6. 'पर्यावरण क्षेत्रात महिलांचे मोठे योगदान' दैनिक लोकमत, 8मार्च, 2019

7. गोडबोले, व. (2019). पर्यावरणीय नेतृत्वः महिलांचे योगदान, भारतीय पर्यावरण संशोधन, 12(3), 55-67.

8. जाधव, आर., & साने, एस. (2020). महिला नेतृत्व आणि पर्यावरण संरक्षण. पर्यावरण आणि विकास, 5(2), 33-42.

9. कुलकर्णी, श. (2021), पर्यावरण संवर्धनात महिलांचा सहभागः एक आढावा. शोधपरिषद, 10(4), 77-85.

10. पाटील, क. (2020). एकविसाव्या शतकात महिलांचे पर्यावरणीय नेतृत्वः आव्हाने आणि संधी. महिला विकास आणि पर्यावरण, 3(1), 45-58.

11. शिंदे, र. (2020). पर्यावरणीय संरक्षणातील महिलाः एक ऐतिहासिक आढावा. भारतीय पर्यावरण इतिहास, 14(2), 134-150.

12. राणे, एस. (2022). जल व्यवस्थापनात महिलांचा सहभागः भारतीय संदर्भ जलविज्ञान आणि संशोधन, 9(2), 22-30.

13.'श्री 'वि'श्वः 'पर्यावरणीय स्त्रीवादाची पावलं' दैनिक लोकसत्ता, १७ फेब्रुवारी, २०२४.